दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक १०६ वा शनिवार दि.२८ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## ग्रामीण भागातील खेळाडूंना मदत करून क्रीडा सुविधा विकसित करणार - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे





उदगीर/ प्रतिनिधी :- ग्रामीण भागातील खेळाडूंना मदत करून मतदारसंघात क्रीडा सुविधा विकसित करणार असल्याचे मत समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, एकुर्का रोड येथे जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी होते तर प्रमुख पाहूणे म्हणून लातूर जि. प. चे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरूके, सरपंच चंद्रकलाबाई ज्ञानोबा कांबळे, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य प्रा. श्याम डावळे, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, क्रीडा समन्वयक कृष्णा केंद्रे, बालाजी मुळे, सपोनि बी. एस. गायकवाड, माजी सरपंच जगदीश जाधव, गटसचिव रामकिशन जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले, ग्रामीण भागात चांगल्या भौतिक सुविधा देत संस्थेने शाळेचे क्रीडांगण विकसित केले आहे. येथून राज्य पातळीवरील खेळाडू तयार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. उदगीर-जळकोट मतदार संघ विकासाचे मॉडेल म्हणून पुढे येत आहे. मी ज्या खात्याचा मंत्री आहे ते क्रीडाक्षेत्रही मागे राहू नये, म्हणून उदगीर येथे दि. १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा घेण्यात येणार असल्याचे सांगीतले.

सुत्रसंचालन रसूल पठाण यांनी केले तर आभार प्रा. कालिदास मुडपे यांनी मानले. यावेळी पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसूरे, रसूल पठाण, किरण हाळीघोंगडे, अमर जाधव यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांरी व ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

## अमित शहांना पवार, ठाकरेंना संपविण्याचे डोहाळे

मुंबई : राज्यात काही दिवसातच विधानसभा निवडणुकांची घोषणा होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी तयारू सुरू केली आहे. काल केंद्रीय मंत्री अमित शाह महाराष्ट्र दौ-यावर आले होते, यावेळी त्यांनी जागावाटपावर बैठका घेतल्या. यावेळी एका सभेत बोलताना त्यांनी खासदार शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. आपले लक्ष शरद पवार, उद्धव ठाकरे यांना रोखणे आहे अशी टीका शाह यांनी केली होती. दरम्यान, आता या टीकेला आज शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'च्या अग्रलेखातून देण्यात आले आहे. महाराष्ट्राला कमजोर करण्यासाठी व मराठी माणसाला कंगाल करण्यासाठी अमित शहा यांना शरद पवार व उद्धव ठाकरे यांना राजकीयदृष्ट्या खतम करायचे डोहाळे लागले आहेत. हे डोहाळे त्यांच्यावरच उलटतील. अमित शहांचे हे डोहाळे जेवण लाचार स्वाभिमानशून्य मिंधे टोळी करत आहे व त्यांना नाशकात हे डोहाळे लागले अशी टीका या लेखातून केली आहे. नाशकात श्राद्ध, अंत्यसंस्कार, नारायण नागबळी यासारखे विधी केले जातात. शिवसेना वगैरे फोडण्याचे डोहाळे ज्यांना लागले आहेत त्यांचे क्रियाकर्म नाशकातील रामकुंडावरच करण्याचा निर्धार मराठी जनतेने केला आहे. उद्धव ठाकरे व शरद पवारांचे पक्ष खतम करण्याविषयी जे बोलतात त्यांनाच नीट फोडून झोडले जाईल.




## बार्टी कडूनहिंदू विधी संहिता विधेयक ना मंजूर झाल्या मुळे कायदेमंत्री पदाचा राजीनामा.



वसमत :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ गोवंदे समतादूत आळणे मिलिंद सर्वप्रथम तथागत गौतम बुध्द, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोनल मोरे होत्या. प्रमुख पाहुण्या जयश्री लोखंडे होत्या.

हिंदू कोड बिल हा भारतातील एक महत्त्वपूर्ण कायदा होता ज्याच्या अंतर्गत समाजातील विवाह, उत्तराधिकार, विभाजन आणि दत्तक विधींचे पुनर्रचनेचे काम केले गेले. या विधेयकाबाबत काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत:

१. पार्श्वभूमी:
ब्रिटिश काळात हिंदू समाजातील स्त्रियांची स्थिती खूपच खालावलेली होती. त्यांना त्यांच्या अधिकारांबाबत कोणताही न्याय मिळत नव्हता. स्वतंत्र भारतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील समितीने हिंदू समाजातील महिलांना हक्क मिळवून देण्यासाठी आणि समतावादी समाजनिर्मितीसाठी हिंदू कोड बिल सादर केले.

२. प्रमुख तरतुदी:
विवाह: यामध्ये एकपत्नीत्व आवश्यक ठरवले गेले. म्हणजेच, एकावेळी एकाच व्यक्तीसोबतच विवाह करता येईल.
विवाह-विच्छेद: घटस्फोटाचे नियम लागू करण्यात आले, ज्यात स्त्रियांनाही घटस्फोटाचा अधिकार दिला गेला.
उत्तराधिकार: यामध्ये मुलींना त्यांच्या वडिलांच्या संपत्तीतील हक्क मिळाला.
दत्तक विधी: दत्तक घेण्यासाठीच्या नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली.

३. प्रतिक्रिया आणि विरोध:
या विधेयकाला काही हिंदू परंपरावादी गटांकडून मोठा विरोध झाला होता. त्यांच्या मते, हे विधेयक हिंदू धर्माच्या पारंपरिक मूल्यांना धक्का देत होते. विधेयक पारित करताना संसदेत मोठ्या प्रमाणात चर्चा आणि विरोध झाले.

४. परिणाम:
हिंदू कोड बिल च्या अधीन आता हिंदू समाजातील स्त्रियांना मुलींना त्यांचे हक्क मिळाले आणि त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण बदल झाले. या कायद्यामुळे भारतातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत मोठा बदल घडला.

हिंदू कोड बिलामुळे भारतीय समाजातील स्त्रियांना न्याय मिळवून देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा पार पडला असता हे २७ सप्टेबर१९५१ साली नामंजूर झाल्ययावेळे कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

कार्यक्रमास अर्पिता मोरे, शुभांगी मोरे, सुनिता वाकळे ,देवानंदा जोगदंड, कौशल्या गायंमिद्रे आभार प्रदर्शन रत्नमाला लोखंडे यांनी केले ,आदीची मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## भाजपाचे निरीक्षक पी व्ही एन माधव यांची आ. कराड यांच्या संवाद कार्यालयास भेट



लातूर :- आंध्र प्रदेश राज्यातील भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा विशाखापट्टणम मतदार संघातील माजी आमदार मा. पी व्ही एन माधवजी यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील संवाद कार्यालयास शुक्रवारी सदिच्छा भेट दिली असता त्यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

येत्या काळात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूक अनुषंगाने मा. माधवजी यांच्याकडे लातूर आणि बीड जिल्ह्याची निरीक्षक म्हणून राष्ट्रीय भाजपाच्या वतीने जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार मा. माधवजी यांनी शुक्रवारी आ. रमेशआप्पा कराड यांच्या भाजपाच्या संवाद कार्यालयास सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांचा आ. रमेशआप्पा कराड यांनी श्री पांडुरंगाची मूर्ती भेट देऊन यथोचित सत्कार केला व स्वागत केले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाची संघटनात्मक ताकद, आ. कराड यांच्या प्रयत्नातून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत झालेली विकास कामे, वैयक्तिक लाभांच्या योजनांची अंमलबजावणी यासह विविध विषयावर मा. माधवजी आणि आ. रमेशआप्पा कराड यांच्यात सविस्तर चर्चा झाली. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राबवण्यात येणाऱ्या यंत्रणेची माहिती जाणून घेतली व अनेक महत्वपूर्ण सुचना मा. माधवजी यांनी यावेळी केल्या.

यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा प्रभारी प्रा. किरण पाटील, लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, जिल्हा उपाध्यक्ष विजय काळे, पद्माकर चिंचोलकर, उमेश बेद्रे, सुरेखा पुरी, अशोक सावंत, ॲड. धनराज शिंदे, सुंदर घुले, शुभम खोशे, प्रशांत शिंदे, सुरेखा मुळे, समाधान कदम, बालाजी गवळी, बाबुराव कस्तुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

## बचतगटातील महिलांना अधिक सक्षम बनविण्यासाठी नवे धोरण आणू

### लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची ग्वाही ; एकता लोकसंचलित साधन केंद्राची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न





लातूर / प्रतिनिधी :- माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांनी महिला बचतगटांना नेहमी बळ दिले आहे. येणाऱ्या काळात लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून महिला बचत गटांना आणखी प्रोत्साहन देऊ. बचतगटांच्या क्षमतेनुसार पतपुरवठा करून अधिकाधिक महिलांना सक्षम करू. यासाठी चांगले धोरण आखून नाविन्यपूर्ण योजना राबवू. बचत गटांच्या हितासाठी महिला आर्थिक महामंडळांशी सामंजस्य करार करून महिलांना आवश्यक ती मदत करू, अशी ग्वाही लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष व लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी दिली. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लातूर येथील एकता लोकसंचलित साधन केंद्राची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा लातूर येथे झाली. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष, आमदार धिरज देशमुख बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, कार्यक्रमाच्या उद्घाटक रीड लातूरच्या संस्थापक सौ. दीपशिखा धिरज देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, सचिन दाताळ, सुभाष घोडके, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे, विनोद सरोदे , राहूल लोंढे , अनिल माने , माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी मन्सूर पटेल , मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ सचिन डिग्रसे , सुजाता तोंडारे, साधन केंद्राच्या अध्यक्ष सुकुमार दरकसे, पार्वती वागलगावे, शोभा सवासे, पूजा इगे , संदीप नेवले , अंजली गुंजाळ आदीसह एकता लोकसंचलित साधन केंद्राचे पदाधिकारी, विविध महिला बचत गटांच्या पदाधिकारी यावेळी उपस्थित होत्या.

आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने महिला बचत गटांसाठी कर्जमर्यादा वाढवली, व्याजदर कमी ठेवला तरी महिलांचा प्रतिसाद कमी आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात जिल्हा बँक महिला बचतगटांना इतरांच्या तुलनेत एक टक्का कमी व्याजदराने पतपुरवठा करेल. तसेच व्याज परतावाही कमी असेल. लातूर जिल्ह्यातील महिला बचत गटांनी आपल्या अडचणी आम्हाला सांगाव्यात, वैयक्तिक कर्जाचे लेखी प्रस्ताव द्यावेत, त्यांना शासनाच्या निकषांप्रमाणे मदत करू. नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ देऊ. अधिकाधिक महिलांना लाभ देण्यासाठी सुधारित योजनांची आखणी करू. सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या हाताला काम मिळेल , अशी व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न करू. जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या शालेय गणवेश , पोषण आहार , शिधा या योजना जिल्ह्यातीलच महिला बचत गटांमार्फत राबविण्यात याव्यात. तसेच गाव तिथे महिला बचत गट व रोजगार निर्माण करण्यासाठी पुढाकार घेवू, असे धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी सांगितले.

## 'धर्मवीर २' वरून खासदार राऊतांची शिंदे-फडणवीसांवर जोरदार टीका

मुंबई : प्रवीण तरडे दिग्दर्शित 'धर्मवीर २' हा चित्रपट आज (२७ सप्टेंबर) थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाबद्दल प्रतिक्रिया देताना शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. दिघेनां भाजपच्या मदतीने बाळासाहेब ठाकरेंच्याही वर नेण्याचा प्रयत्न केला जात आहे.



कारण बाळासाहेब ठाकरेंचे महाराष्ट्रातील कोट्यवधी समर्थक एकनाथ शिंदेंना मानत नाहीत.त्यामुळे अशा चित्रपटाच्या माध्यमातून एक नवे प्रतिक निर्माण करायचा हा प्रयत्न केला जात आहे, अशी ठीका राऊत यांनी केली. धर्मवीर आनंद दिघे काय होते, त्यांची व्याप्ती काय होती, हे आम्हाला माहीत आहे. ते देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंना माहीत नाही.असा टोला ही खासदार राऊतांनी शिंदे-फडणवीसांना लगावला.

धर्मवीर २ सिनेमाचे स्पेशल स्क्रीनिंग काल मोठ्या दिमाखात पार पडले. या चित्रपटाच्या प्रीमिअरला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गैरहजर होते. धर्मवीर-२ या सिनेमातून आनंद दिघे यांच्या मृत्यूपासून ते एकनाथ शिंदे यांच्या बंडापर्यंतचा पट उलगडवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# संपादकीय....

## कृषी कर्जासाठी : यूएलआय

शेतकर्यांसाठी कृषी कर्जामध्ये सुलभता निर्माण व्हावी म्हणून युनिफाइड लेंडिंग इंटरफेस (यूएलआय) ही नवी एकीकृत कर्ज वितरण प्रणाली रिझर्व्ह बँकेने सुरू केली आहे. भारताने डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणलेले आहेत. आरबीआयने सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रात निर्माण केलेल्या युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) यंत्रणेला देशभरात अभूतपूर्व यश मिळवून दिले. आज देशाच्या कानाकोपर्यात छोट्या-मोठ्या प्रकारचे सर्व खरेदी-विक्रीचे व्यवहार याच माध्यमातून केले जात आहेत. त्याद्वारे पैसे पाठवणे हे अत्यंत सोपे झाले आहे. त्यामुळेच या डिजिटल यंत्रणेचा वापर करून डिजिटल क्रेडिटमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. आरबीआयची बंगळुरू येथे 'रिझर्व्ह बँक इनोव्हेशन हब' ही उपकंपनी कार्यरत आहे. या उपकंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश बन्सल यांनी नव्या माहिती प्रणालीचा तपशील जाहीर केला. याचा लाभ देशभरातील लाखो छोट्या-मोठ्या शेतकर्यांना तसेच छोट्या-मोठ्या उद्योजकांनाही कर्ज मिळवण्यासाठी सुलभता निर्माण करणारा ठरणार आहे. एक प्रकारे संपूर्ण बँकिंग क्षेत्रामध्येच यूएलआयमुळे एक प्रकारची नवीन क्रांती होणार असल्याचे यूपीआयच्या यशावरून तरी दिसून येते. रिझर्व्ह बँकेने ही प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर ऑगस्ट २०२३ मध्ये दोन राज्यांमध्ये राबवली होती. त्यावेळी त्याचे नाव 'एफसीपी' म्हणजे 'फ्रिक्शनलेस क्रेडिट प्लॅटफॉर्म' असे होते. त्याला आता अधिकृतपणे 'यूएलआय' नाव देण्यात आले आहे. त्यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये रिझर्व्ह बँकेने किसान क्रेडिट कार्डाचे डिजिटलायझेशन करून १ लाख ६० हजारांपेक्षा कमी रकमेची कर्जे मध्य प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर शेतकर्यांना देण्यात आली. त्याचा रिझल्ट चांगला आल्यामुळे नवीन 'यूएलआय'चा वापर करून कृषी कर्ज सुलभ करण्याची योजना रिझर्व्ह बँकेने आखलेली आहे.

यूएलआयची प्रक्रिया - ग्राहकाच्या म्हणजे प्रत्येक शेतकर्याच्या किंवा कर्ज घेणार्या व्यक्तीच्या पूर्वपरवानगीने त्याची सर्व व्यक्तिगत माहिती यामध्ये नोंदवली जाईल. त्यात त्याच्या मालकीच्या विविध राज्यातील जमिनीची नोंदही असेल. ही सर्व माहिती कर्ज देताना किंवा घेताना उपयोगी पडणार असून ती विविध स्तोत्रांकडून एकत्र संकलित केली जाणार आहे. प्रारंभीच्या काळात छोट्या रकमेची कर्जे घेणारे ग्रामीण भागातील शेतकरी यांच्यासाठी ही योजना सुरू केली जाणार आहे. प्रत्येक कर्जदाराची म्हणजे ऋणकोची आर्थिक आणि बिगर आर्थिक माहिती तपासून त्याला कर्ज देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. देशातील शेतकरी वर्गाबरोबरच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांनाही त्यांची कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी या यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. यामुळे छोट्या व ग्रामीण भागातील शेतकरी तसेच उद्योजक यांची कर्ज घेण्याची क्षमता तपासण्याचा कालावधी अत्यंत कमी होणार असून त्यात शंभर टक्के विश्वासार्हता निर्माण केली जाणार आहे. बँकांच्या दृष्टिकोनातून कोणतेही छोटे, मोठे कर्ज द्यावयाचे झाले तर त्याची सर्व प्रकारची तपासणी केली जाते. त्यास क्रेडिट अप्रायझल म्हणजे पतपुरवठा मूल्यांकन असे म्हणतात. या यंत्रणेमध्ये सर्वसाधारण व प्रमाणित ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग संवेदकाचा म्हणजे 'एपीआय'चा अंतर्भाव केलेला असल्याने ही सर्व प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ होणार आहे. विविध स्रोतांकडून मिळणार्या माहितीशी चटकन जोडता यावे यासाठी 'प्लग अँड प्ले' या पद्धतीचा वापर बँका, बिगर बँकिंग वित्त संस्था किंवा पतसंस्थांना करता येणार आहे. यामध्ये सर्व तांत्रिक प्रक्रिया अत्यंत जलदगतीने पूर्ण होणार असल्याने कर्ज मागितल्यापासून कर्ज मिळण्यापर्यंतचा कालावधी अक्षरशः काही तासांचा किंवा अगदी कमाल म्हणजे केवळ एक दिवसाचा होऊ शकेल इतकी कार्यक्षमता या यंत्रणेमध्ये आहे. कर्ज घेणार्या व्यक्तीची सर्व माहिती अगोदरच उपलब्ध असल्याने त्यांच्या कर्ज प्रक्रियेची पूर्तता करण्यासाठी अन्य कागदपत्रांची आवश्यकता लागणार नाही. यामध्ये मल्टिपल डेटा प्रोव्हाइडर्ससह कर्ज देणार्या संस्था, बँका किंवा वित्त संस्था यांच्याकडे विविध राज्यांतील जमिनींची नोंदणी उपलब्ध होणार आहे. त्यामध्ये कर्ज घेणार्याची तपशीलवार माहिती उपलब्ध असेल त्यामुळे ग्रामीण भागातील कर्जदारांना शेतकर्यांना कमी रकमेचा कर्जपुरवठा 'यूपीआय'च्या माध्यमातून त्वरित केला जाऊ शकेल. कर्जदारांनी एकदा कागदपत्रे दिल्यानंतर पुन्हा कधीही कर्ज घेताना हीच कागदपत्रे आधारभूत ठरणार आहेत. त्यामुळे कृषी व छोट्या लघु उद्योग क्षेत्रातील ग्राहकांना कर्ज मिळवणे अत्यंत सोपे होणार असून त्यांना पुन्हा कागदपत्रे दाखवायला लागणार नाहीत व त्याची आजवर घेतलेल्या सर्व कर्जांची माहिती कर्ज देणार्या संस्थांना सहजपणे उपलब्ध होणार आहे. यूएलआयचे फायदे - शक्तिकांत दास यांच्या मते, जनधन आधार, यूपीआय आणि यूएलआयचे नवीन त्रिकूट भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांच्या प्रवासात एक मैलाचा दगड ठरेल. कृषी आणि एमएसएमई क्षेत्राशी संबंधित ज्या लोकांना कर्ज घ्यायचे आहे त्यांना मोठा फायदा होईल असेही ते म्हणाले. या निमित्ताने कर्ज प्रक्रियेतील 'मध्यस्थाच्या' वाईट प्रथा बंद पडणार आहेत.

# २८ सप्टेंबर महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग जयंती

पाकिस्तान मधील पंजाब प्रांतातील बांगा गावांमध्ये २८ सप्टेंबर १९०७ ला भगतसिंग नावाचा क्रांतिकारक तेजस्वी तारा जन्माला आला आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश निर्माण झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात प्रज्वलित झाली आणि वयाच्या १४ व्या वर्षी स्वतंत्र लढ्यात उडी घेतली.भगतसिंग यांच्या आई-वडीलांनी भगतसिंग यांचे लग्न १९ व्या वर्षी करण्याचा विचार केला.परंतु त्यांनी लग्नास नकार दिला व घर सोडून निघून गेले आणि आपल्या आई-वडिलांकरीता एक पत्र लिहिले या पत्रात भगतसिंग लिहितात मेरा जीवन एक महान उद्देश के लिये समर्पित है और वह उद्देश देश की आजादी है इसलीये मुझे तबतक चैन नही है.ना ही मेरी ऐसी कोई सांसारिक सुख की इच्छा है. यावरून स्पष्ट झाले की त्यांच्या नसानसात स्वातंत्र्याची ज्वाला धकधकत होती. ८ एप्रिल १९२९ ला भगतसिंग यांनी आपले क्रांतीकारी मित्र बटुकेश्वर दत्त यांच्या सोबत दिल्लीतील सेंट्रल असेम्ब्लीवर बाँब टाकला व इंग्रजांना जबरदस्त धक्का दिला यामुळे संपूर्ण भारतात स्वातंत्र लढ्याचा आगास झाला.आज शहिदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे. अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलीदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली.त्यामुळे जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला.हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पहावले नाही.त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले.परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले.शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोण्हीही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.यामुळेच देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. यामुळे महागाई, बेरोजगारी, गरीब व सर्वसामान्यांचे हाल-बेहाल होतांना दिसते.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशवासीयांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्यान व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती झाल्याचे दिसून येतात. भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांनी फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य आणि चांगला उपयोग करून जनसेवा केली पाहिजे.तेंव्हाच शहिद-ए-आजम भगतसिंग यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.त्यामुळे सावधान!राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी-कोटी प्रणाम शहिद भगतसिंग यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन व सामाजिक संस्था यांनी भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व झाडांच्या पानांत,फुलात, फळात आपल्याला शहिद भगतसिंग सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल.जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा शहिद भगतसिंग यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

*************

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.

# रेबीज पासून सावध; उगीच लळा नको !

जागतिक रेबीज दिन ही आंतरराष्ट्रीय जागरूकता मोहीम ग्लोबल अलायन्स फॉर रेबीज कंट्रोल या संयुक्त संस्थेने सुरू केली असून त्या संस्थेचे मुख्यालय अमेरिकेमध्ये आहे. हे संयुक्त राष्ट्रांचे निरीक्षण आहे आणि वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, पॅन अमेरिकन हेल्थ ऑर्गनायझेशन, वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर ॲनिमल हेल्थ आणि यूएस सेंटर रोग नियंत्रण आणि प्रतिबंध यासारख्या आंतरराष्ट्रीय मानवी आणि पशुवैद्यकीय आरोग्य संस्थांनी त्याचे समर्थन केले आहे. जागतिक रेबीज दिन प्रत्येक वर्षी २८ सप्टेंबर रोजी लुई पाश्चरच्या मृत्यूच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केला जातो, ज्यांनी आपल्या सहकार्यांच्या सहकार्याने रेबीजची पहिली प्रभावी लस विकसित केली. 'जागतिक रेबीज डे'चा उद्देश मानव आणि प्राण्यांवर रेबीजच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढविणे, धोकादायक रोग कसा रोखता येईल याविषयी माहिती आणि सल्ला प्रदान करणे आणि रेबीज नियंत्रणातील वाढीव प्रयत्नांसाठी वकिलीचे समर्थन करणे हे आहे.

जगातील बऱ्याच देशांमध्ये रेबीज ही एक महत्त्वाची आरोग्य समस्या आहे. विकसनशील जगात सर्व मानवी मृत्यूंपैकी ९९% मृत्यू रेबीड कुत्रा चावल्यामुळे होतात, तर आफ्रिका आणि आशियात ९५% मृत्यू होतात. अंटार्क्टिकाचा अपवाद वगळता प्रत्येक खंडातील लोक आणि प्राणी यांना रेबीजचा धोका संभवतो. रेबीज प्रतिबंधातील एक मोठी समस्या जोखीम असलेल्या लोकांमध्ये मूलभूत जीवन-रक्षण ज्ञानाचा अभाव ही आहे. या विषयावर काम करणाऱ्या संस्था बऱ्याचदा वेगळ्या वाटू शकतात आणि दुर्लक्षित रोग म्हणून, रेबीजकडे पुरेसे संसाधने आकर्षित होत नाहीत. आरोग्य जागरूकता दिवस रोगांवरील धोरण सुधारित करण्यात मदत करतात आणि प्रतिबंधित करण्यासाठी आणि त्यांची संसाधने वाढवू शकतात. या आकलनामुळे रेबीज विरुद्ध जागरूकता दिवस साजरा करण्यात येऊ लागला.

रेबीज हा उष्ण रक्ताचे प्राणी विशेषतः कुत्रा, ससा, माकड, मांजर इत्यादी चावल्यानंतर होणारा रोग आहे. या रोगामध्ये रोगी पाण्याला घाबरत असल्याने त्यास जलसंत्रास असे म्हणतात. रेबीज हा रोग झाल्यास तो प्राणघातक आहे. मात्र रोग होण्यापूर्वी लस देऊन त्यापासून संरक्षण करता येते. रेबीज हा रोग कुत्र्यांनाही होतो. हा कुत्र्यांमुळे माणसात पसरणारा रोग आहे. कुत्रा चावल्यानंतर या आजाराची लक्षणे ९० ते १७५ दिवसात दिसू लागतात. जंगलातले लांडगे जंगली कुत्र्यांना चावतात, त्यामुळे जंगली कुत्र्यांना रेबीज होतो आणि ही जंगली कुत्री गावातल्या कुत्र्यांना चावतात त्यामुळे त्यांना हा रोग होतो. अशी रेबीज झालेली कुत्री माणसास चावल्यास माणसांना हा रोग होतो. कुत्र्याच्या लाळेद्वारे या रोगाचा प्रसार होतो. रेबीज हा रोग कोणत्याही उष्ण रक्ताच्या प्राण्याला होऊ शकतो, उदा. माणूस. हा रोग पक्ष्यांमध्येसुद्धा आढळून आला आहे. वटवाघळे, माकडे, कोल्हे, गाईगुरे, लांडगे, कुत्री, मुंगूस अशा काही प्राण्यांपासून माणसाला रेबीजचा धोका संभवतो. इतर जंगली प्राण्यांमुळे सुद्धा रेबीज होऊ शकतो. खारी, हॅमस्टर, गिनी पिग, उंदीर ह्या प्राण्यांमध्ये अगदी क्वचितच रेबीज आढळतो. रेबीजचा जीवाणू प्राण्याच्या नसांमध्ये आणि लाळेत आढळतो. हा रोग बहुधा प्राण्याच्या चावण्यामुळे होतो. बऱ्याच वेळा प्राणी चिडून हल्ला करतो आणि चावा घेतो. माणसांमधून रेबीजचा प्रसार फारच क्वचित होतो.

साधारणपणे २ ते १२ आठवडे ताप आणि तापाची लक्षणे दिसून येतात. मानसिक त्रास, निद्रानाश, भास होणे, सामान्य माणसासारखे न वागणे, अतिशयोक्ती करत वागणे अशी रोग्यात लक्षणे दिसून येतात. रेबीज झालेल्या माणसाला पाण्याची खूपच भीती वाटते. रेबीज झालेल्या माणसाचा घसा पूर्णपणे खरवडून निघतो व जेव्हा तो माणूस काही बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्वा घसा खरवडलेला असल्यामुळे कुत्र्याच्या भुंकण्याप्रमाणे आवाज येतो. वास्तविक कुत्रा चावला म्हणून असा आवाज येतो असे काही नाही. पण काही अशिक्षित माणसे असा विचार करून कुत्र्यांना मारतात. पाळीव कुत्र्याचे रेबीजपासून संरक्षण करण्याकरीता तीन महिन्यापेक्षा मोठ्या वयाच्या पाळीव कुत्र्याला दर सहा महिन्यांनी रेबीजची लस देणे आवश्यक असते. पाळीव कुत्र्याला कुठल्याही प्रकारे भटक्या कुत्र्यांच्या संपर्कात येऊ देणे धोक्याचे असते. कुत्र्यात वेगळे असे काही जाणवल्यास पशुवैद्यकांशी संपर्क साधणे गरजेचे असते. तसेच भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यास त्यांची संततनियमन शस्त्रक्रिया करतात. वटवाघळांपासून आपल्या कुत्र्याला दूर ठेवल्यास रेबीजची लागण होण्याची शक्यता दुरावते.

प्राणी चावल्याने जखम झाल्यावर लवकरात लवकर साबण व स्वच्छ पाण्याने धुतल्यास जखमेतील रेबीजचे जंतू कमी होण्यास मदत होते. शक्य असल्यास त्यावर ॲंटिसेप्टिक मलम लावावे व त्वरित जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. रेबीजवर पीईपी (पोस्ट एक्स्पोजर प्रोफायलॅक्सिस) ही प्रभावी लस उपलब्ध असून कुत्रे चावल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने ती टोचून घेणे योग्य आहे. पेशंटने मानवी रेबीज इम्युनोग्लोबुलिनचा एक डोस व रेबीज लसीचे चार डोस १४ दिवसात घेतले पाहिजेत. रेबीज लसीचा पहिला डोस जखम झाल्यावर लवकरात लवकर दिला पाहिजे. त्यानंतर तीन, सात व चौदा दिवसांनी लसीचे डोस द्यावेत. ज्या पेशंटने जखम व्हायच्या आधीच लसीकरण घेतले असेल, त्याने इम्युनोग्लोबुलीनचा डोस नाही घेतला तरी चालतो. त्याने जखम झाल्यानंतरचे लसीकरण जखम झाल्यावर व दोन दिवसांनी घ्यावे. आजकाल पोटात घ्यायची इंजेक्शने देण्याची गरज नसून दंडावर देण्याचे इंजेक्शन उपलब्ध आहे. प्राण्याच्या मेंदूच्या परीक्षणाद्वारे या रोगाचे निदान करता येते. त्यासाठी प्राण्याचे पाच ते दहा दिवस निरीक्षण करण्याची अत्यंत गरज असते.

सतत लाळ गळणे, मलूल पडून राहणे, हालचालींवर ताबा नसणे, ताप येत राहणे, डोकेदुखी, निद्रानाश, पाण्याची भीती वाटणे आणि नाकातून डोळ्यांतून आणि कानांतून पस तत्सम घाण पाणी बाहेर येणे आणि उगाचच भुंकणे अथवा भुंकायचा प्रयत्न करणे ही रेबीज ह्या रोगाची लक्षणे आहेत. या रोगामध्ये प्राणी अस्वस्थ आणि बेचैन होतो, आवाज आणि उजेडाचा त्याच्यावर लवकर प्रभाव पडतो, तो तहानभूक सर्व विसरून जातो व कोणतीही वस्तू चावण्याचा प्रयत्न करतो. तसेच या मध्ये प्राण्याची खूप लाळ गळते, त्याचे डोळे भयानक दिसतात, त्याला पाण्याची भीती वाटते, त्याला ताप येतो व तो कशाही उड्या मारू लागतो. या प्रकारात प्राण्याला कधी कधी लकवा येतो व मानेचे स्नायू कडक होतात; प्राणी त्याचे शेपूट मागील दोन पायात घालून चालतो. या प्रकारात प्राण्याला प्रथम मज्जारज्जूला आणि नंतर मेंदूलाही संसर्ग पोहोचतो. नंतर हृदय, फुफ्फुसे यांनापण संसर्ग होतो, अर्धांगवायु होतो, प्राण्याची शुद्ध हरपते व नंतर मृत्यू होतो.

*************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# निवडणुकीच्या काळात नागरिकांची जरुरी किरकोळ कामे करायला नाकारतात!

सर्व राज्यांत विधानसभा निवडणुकीची फार जोरात तयारी सुरु आहे.याआधी प्रशासकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत असून काही कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी सरकारी नौकर वर्गाची नेमणूक झालेली दिसून येत आहे.

प्रत्येक निवडणुक वेळी हमेशा नागरिकांना सरकारी कामे करून घेण्याकरिता दर रोज खूप त्रास सहन करावा लागतो.निवडणुकीच्या कामाला ०४ तास वेळ देऊन सर्व कार्यालयीन कामकाज ०४ तास पुर्ण करण्याची व नागरिकांच्या तक्रारी, गंभीर समस्या अडचणी सोडवायची जबाबदारी शासकीय अधिकारी कर्मचारी यांची नाही का? सर्व सामान्य कामगार हा दर दिवस रोजंदारी च्या कामावर जायला सकाळी लवकर झोपेतून उठून सकाळ पासून ते संध्याकाळपर्यंत २००/३००रू.रोजाने शारीरिक श्रम मेहनत करण्यास जातात यासाठी कमी मोबदला मिळाला तरीही तक्रार न करता नियमित काम धंदा करतात.परंतु सरकारी अधिकारी कर्मचारी यांना सर्व सोयी सुविधा मिळत असताना आणि सरकारी मोठा पगार दिला जात असतानी निवडणूक होईपर्यंत कार्यालयात ईमानदारीने लवकर वेळेवर येऊन कामाला लागले तर निवडणुकीच्या काळात सुद्धा सर्व सामान्य नागरिकांचे कामे होणार नाहीत का? यामुळे पूर्वी पासून आता पर्यंत नागरिकांच्या मनात विनाकारण निवडणूकीचा भ्रम दबाव निर्माण केल्याने सर्व सामान्य जनता नागरिकांना आपला काम धंदा सोडून आर्थिक नुकसान होऊन सरकारी कामे करून घेण्यास दैनंदिन कार्यालयात कार्यवाही पाठपुरावा करण्यास नेहमी चकरा फे-या माराव्या लागत आहेत. या सार्वजनिक व वैयक्तिक मूलभूत मागणीची सरकारी कार्यालयांनी दखल घ्यावी ही विनंती. दिनांक:२७/०९/३०२४ आपला विश्वासू सर्व सामान्य भारतीय नागरिक -रमेश कांबळे रा. परतूर जिल्हा जालना. महाराष्ट्र राज्य. मोबाईल नंबर:८८०५५८२४८० जय संविधान! जय भीम!! जय भारत!!! ही महत्त्वाची पोस्ट सर्वत्र शेयर करावी.

# सगळ्यांनाच ताकीद

पारदर्शकतेच्या हल्लीच्या जमान्यात प्रत्येक बाब बहुतांश खुली झाली असल्यामुळे कोणता मेंदू कोणत्या दिशेने काम करेल याची शाश्वती देता येत नाही. कर्नाटक न्यायालयातील एका प्रकरणात असाच प्रकार घडला व त्याला गंभीर वळण लागले. अर्थात, कोणी कसेही वळण देण्याचा प्रयत्न केला तरी मूळ विषयच किंवा मूळ व्यक्त केलेले मतच गंभीर होते आणि सर्वथा अनावश्यक होते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाला त्याची दखल घ्यावी लागली आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्याच एका न्यायाधीशांना ताकीद द्यावी लागली. ताकीद केवळ एका विशिष्ट न्यायाधीशांना नव्हती, तर समाजातील प्रत्येक स्तरात कार्यरत असणार्या प्रत्येक व्यक्तीला ती होती. त्यामागचे गांभीर्य सगळ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे.

कर्नाटकातील एक घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद होता. प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत गेले. सुनावणीच्या वेळी न्यायाधीशांनी टिप्पणी करताना बंगळुरूच्या एका विशिष्ट भागाचा 'पाकिस्तान' असा उल्लेख केला. तसेच एका महिला वकिलाविषयीही आक्षेपार्ह मत नोंदवले. न्यायाधीशांना आपली चूक लक्षात आल्यावर त्यांनी माफीही मागितली. आपल्या समाजात महिलांविषयी जे पूर्वग्रह आहेत ते डोकावतातच हे त्यांच्या टिप्पणीवरून पुन्हा सिद्ध झाले. हे पूर्वग्रह अगदी ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत सगळीकडेच दिसून येतात. अगदी मोठे दिग्गज नेते एखाद्या महिला प्रतिनिधीने विचारलेल्या प्रश्नालाही महिलेने विचारलेला प्रश्न असाच अँगल देत त्याला त्याअनुरूप उत्तर देतात आणि बर्याचदा गंभीर प्रश्नही मग थट्टेवारी नेला जातो.

आता अगदी अलीकडच्या काळात राज्यसभा सदस्या जया बच्चन यांच्या विषयीचा मुद्दा त्याबाबत पुरेसा बोलका आहे. 'मी एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, मला माझी स्वत:ची ओळख आहे व ती मी निर्माण केली आहे', असे जया बच्चन यांचे म्हणणे होते. तथापि, सभागृहात त्यांच्या नावाचा पुकारा करताना त्यांचे पूर्ण नाव घेतले गेले. त्यांनी आक्षेप घेतला तरी पुन्हा तसेच केले गेले आणि ज्या गांभीर्याने जया बच्चन यांचे म्हणणे घेणे आवश्यक होते तसे ते घेतले नाही. कर्नाटक उच्च न्यायालयातही महिला वकिलाशी बोलताना शब्दांच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्या. दुसरी गोष्ट तेथे घडली ती शहरातील संबंधित भागाचा पाकिस्तान असा उल्लेख केला गेला. समाज माध्यमांवर हीच बाब मोठ्या प्रमाणात पसरवली गेली. आपल्या देशातील कोणत्याही भागाला असे पाकिस्तान संबोधणे प्रादेशिक अखंडतेच्या विरोधात आहे, असे सरन्यायाधीशांनी सांगितले. एखाद्या भागाला पाकिस्तान म्हणणे अथवा असे म्हणून डिवचणे हा प्रकार केवळ न्यायालयात घडला असे नाही तर दिवसात किमान अशी दहा उदाहरणे आपल्या ऐकण्यात, पाहण्यात आणि वाचनातही येतात. पाकिस्तान, छोटा पाकिस्तान अशी विशेषणे सर्रास लावली जातात. केवळ भागांना तशी ओळख देण्यापुरते हे मर्यादित नाही. सार्वत्रिक मान्य केल्या गेलेल्या लोकप्रिय समाजाच्या पलीकडे जर कोणी कोणत्या विषयावर वेगळी भूमिका घेतली, तरी त्याला 'पाकिस्तानात जा' असे चटकन सांगितले जाण्याची प्रथाही आपल्याकडे रूढ आहे. याचा फटका भल्याभल्यांना बसला आहे. त्यात देशातील अनेक नामांकित मंडळींचा समावेश आहे.

# सात गुन्ह्यात फरार असलेल्या कुख्यात आरोपीला अटक . त्याने चोरलेल्या ७ मोटारसायकली जप्त. चार गुन्हे उघड.

## स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कामगिरी

लातूर :- सात गुन्ह्यात फरार असलेल्या कुख्यात आरोपीला अटक . त्याने चोरलेल्या ७ मोटारसायकली जप्त. चार गुन्हे उघड. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सदर पथक माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २६/०९/२०२४ रोजी पथकाला माहिती मिळाली की, लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दी मधून मोटारसायकल चोरीचे गुन्हे केलेला तसेच लातूर शहरातील एक ए.टी.एम. चोरण्याचा प्रयत्न केलेला गुन्हेगार करणसिंग लक्ष्मणसिंग बावरी हा त्याच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी संजयनगर येथील घरी आला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक २६/०९/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संजयनगर येथील त्याच्या घरी पोहोचून करणसिंग लक्ष्मणसिंग बावरी याला ताब्यात घेऊन त्याने व त्याचे सोबत

-अर्जुनसिंग लक्ष्मण सिंग बावरी, वय २४ वर्ष, राहणार संजय नगर, लातूर.

-अनिल धावारे, राहणार संजय नगर, लातूर.

अशा तिघांनी मिळून लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून मोटारसायकली चोरून ते एकदाच विकण्यासाठी वैशाली नगर लातूर येथील एका मदरशाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या मैदानातील गवतामध्ये लपवून ठेवलेल्या ३ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या सात मोटारसायकली जप्त करण्यात आले आहेत. पथकाने करणसिंग बावरी यांच्या ताब्यातून जप्त केलेल्या मोटार सायकल संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची मोटरसायकली लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरी केल्याचे सांगितले.



तसेच नमूद सराईत गुन्हेगार करणसिंग लक्ष्मणसिंग बावरी यांने वरील दोन साथीदारासह मिळून गणेश मंदिर, लातूर येथील एक पिकअप वाहन चोरून त्याच्या साह्याने बार्शी रोडवरील ए.टी.एम. तोडून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला होता. त्यावरून नमूद आरोपीचा विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पण गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा दाखल झाल्यापासून नमूद आरोपी फरार होता.

तसेच सराईत गुन्हेगार करणसिंग बावरी हा पोलीस ठाणे निलंगा, शिरूर आनंतपाळ, गांधी चौक, एमआयडीसी येथील प्रत्येकी एक गुन्ह्यात तर पोलीस ठाणे विवेकानंद चौक येतील दाखल तीन येथील तीन गुन्ह्यात फरार होता. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कार्यवाहीमुळे बऱ्याच कालावधीनंतर करणसिंग बावरी हा पोलिसाच्या तावडीत सापडला असून त्याला ताब्यात घेऊन पुढील तपास केल्याने अनेक गुन्ह्याची उकल होणार आहे.

नमूद आरोपीला पुढील कार्यवाहीस्तव पोलीस ठाणे गांधी चौक यांचे ताब्यात देण्यात आले आहे. संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार राहुल सोनकांबळे, रियाज सौदागर, योगेश गायकवाड, साहेबराव हाके, मनोज खोसे, राहुल कांबळे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, संतोष खांडेकर यांनी पार पाडली.

# चाकूर सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

चाकूर: येथील विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन डॉक्टर गोविंदराव माकने यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी संस्थेच्या परिसरात संपन्न झाली. चाकूरच्या या सोसायटीचा नावलौकिक सहकार क्षेत्रामध्ये राज्यभर आहे. विशाल विविध सेवा सहकारी सोसायटी ही सभासदांच्या हिताचे अनेक हितकारक निर्णय घेण्यामध्ये प्रसिद्ध आहे. या सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांना बाजारभावापेक्षा कमी दराने ५० किलो साखर व पंधरा टक्के लाभांश वाटप करण्यात येणार असल्याचा निर्णय सोसायटीच्या वतीने यावेळी घेण्यात आला. प्रसंगी या संस्थेकडून खते औषधे बी बियाणे खरेदी करणाऱ्या सभासदांचा सन्मान यावेळी करण्यात आला



सोसायटीच्या माध्यमातून विविध सामाजिक व शेतकरी सभासदांच्या हिताचे उपक्रम राबवण्यात येतात येणाऱ्या काळातही अशाच प्रकारचे बहुआयामी उपक्रम राबवण्याचा मानस असल्याचे चेअरमन डॉक्टर गोविंदराव माकणे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्रसंगी व्हाईस चेअरमन बालाजी तलवारे, संचालक जाकीर कोतवाल, राधाकिशन तेलंग, शिरीष रेड्डी, अजय नाकाडे, मन्मथ पाटील, अनिता अलमाजी, निर्मला फुलारी, दिगंबर मोरे , दिलीप कोलावार, हनुमंत उस्तुर्गे नारायण बेजगमवार , सत्यविजय कुलकर्णी, व्यवस्थापक कपिल अलमाजी, लक्ष्मण उमाटे सोसायटीचे कर्मचारी शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोक्यातला स्ट्रेस जेव्हा चेहऱ्यावर येतो तेव्हा 'अशाप्रकारे' केस आणि त्वचा होते खराब

आजकाल प्रत्येक जण स्वतःचे स्वप्न पूर्ण करण्यात गुंतला आहे. अशावेळी ती स्वप्न पूर्ण न झाल्यास अनेक जणांना स्ट्रेस येऊ लागतो. हल्ली बदलती लाइफस्टाइल सुद्धा याला कारणीभूत आहे. आज आपले सर्वांचेच जीवन एवढे व्यस्त झाले आहे की आपल्याला इतर गोष्टींसाठी वेळच मिळत नसतो. आज कित्येक जण जॉब करून घेणारी येतात तेव्हा त्यांच्याकडे पाहूनच समजते की हे तणावाखाली जगात आहे. तर दुसरीकडे असे कित्येक तरुण आहेत जे सोशल मीडियावरून प्रभावित होऊन डोक्यात स्ट्रेस घेऊन बसतात.

पण तुम्हाला माहीत आहे का की स्ट्रेस घेण्याने तुमच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर तसेच तुमच्या त्वचेवर आणि केसांवर खोलवर परिणाम होऊ शकतो? तज्ञ म्हणतात की दीर्घकाळ तणावामुळे तुमची त्वचा कोरडी, निर्जीव आणि वाईटरित्या प्रभावित होऊ शकते. शिवाय, हे केस गळण्याचे मुख्य कारण बनू शकते.

जेव्हा एखादा व्यक्ती स्ट्रेस म्हणजेच तणावाखाली असतो तेव्हा शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोनचे प्रमाण वाढते. त्यामुळे त्वचेची नैसर्गिक नमी कमी होऊ लागते, त्यामुळे त्वचा कोरडी आणि खडबडीत होते. याशिवाय तणावामुळे तुमच्या त्वचेतील बारीक रेषा आणि सुरकुत्या देखील वाढू शकतात. अनेकदा तणावामुळे चेहऱ्यावर मुरुम आणि एक्जिमासारख्या समस्याही उद्भवू शकतात.

दीर्घकाळ तणावाखाली असलेल्या लोकांच्या त्वचेत लालसरपणा, सूज आणि चिडचिड यांसारखी लक्षणे दिसू शकतात, असे त्वचातज्ज्ञांचे मत आहे. याशिवाय त्वचेवर काळी वर्तुळे आणि थकलेली त्वचा हे देखील तणावाचे परिणाम आहेत.




तणावाचा केसांवर अशाप्रकारे होतो परिणाम तणाव हा केसांचाही मोठा शत्रू ठरू शकतो. दीर्घकाळ तणावामुळे केस गळणे सामान्य होते. याचे कारण म्हणजे तणावाच्या काळात शरीरात हार्मोनल असंतुलन होते, ज्यामुळे केसांच्या वाढीवर परिणाम करते. त्यामुळे केस लवकर गळतात आणि त्यांची डेन्सिटी कमी होते. तणावामुळे केसांची मुळे कमकुवत होऊ शकतात, ज्यामुळे केस पातळ होतात आणि ते तुटण्याची शक्यता वाढते. याशिवाय, काही प्रकरणांमध्ये, तणावामुळे केस पांढरे होऊ लागतात. तसेच टाळूवर कोंडा देखील निर्माण होऊ शकतो.

स्ट्रेस कमी करण्याचा सोपा उपाय तज्ज्ञांच्या मते, योग, ध्यान आणि नियमित व्यायाम हे स्ट्रेस कमी करण्याचे प्रभावी मार्ग आहेत. तसेच, वेळोवेळी विश्रांती घेणे आणि योग्य झोप घेणे देखील महत्वाचे आहे. आरोग्यदायी आहार आणि त्वचेची निगा राखून त्वचा आणि केस निरोगी ठेवता येऊ शकतात. म्हणूनच, जर तुम्हाला तुमची त्वचा आणि केस निरोगी ठेवायचे असतील तर तणाव कमी करणे अत्यंत आवश्यक आहे.

# तुम्ही मावा आणि सुका मेवा देखील एकच मानता का? या दोघांमधील फरक जाणून घ्या

तुम्ही बाजारातून मिठाई आणली असेल आणि भरपूर खाल्ली असेल. मिठाईच्या दुकानांमध्ये आता विविध प्रकारच्या मिठाई उपलब्ध आहेत. भिन्न चव, रंग आणि भिन्न किंमती. मिठाई बनवण्यासाठी साधारणपणे छेना, दूध, साखर, खवा किंवा मावा, सुका मेवा इत्यादींचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. काही मिठाई फक्त दूध आणि साखरेपासून बनवल्या जातात. दूध घट्ट करून तयार केलेला खवा किंवा मावा बनवला जातो. त्यात सुक्या मेव्याचाही समावेश आहे. अनेक वेळा लोक मावा आणि सुका मेवा सारखाच मानतात. काही लोक माव्याला ड्रायफ्रुट्स आणि ड्रायफ्रुट्स मावा म्हणतात. त्याचबरोबर काही लोक खवा आणि मावा याला वेगळे मानतात. पण, तुम्हाला माहीत आहे का त्यांच्यात काय फरक आहे? खवा आणि मावा एकच आहे का? अनेक मिठाई फक्त माव्यापासून बनवल्या जातात. माव्यापासून बनवलेल्या मिठाईची चव खूप मजबूत असते. खरे तर खवा आणि मावा एकच आहे. खव्यालाच मावा म्हणतात. मावा हा दुधाचा पदार्थ आहे, जो कोणीही घरी सहज बनवू शकतो. माव्याचे तीन प्रकार आहेत, ज्यामध्ये बत्तीखोया अतिशय कडक, टणक आणि गोठलेला असतो. दुसरा दाणेदार खवा आणि तिसरा गुळगुळीत खवा. शुद्ध मावा तुम्ही घरी बनवा किंवा बाजारातून विकत घ्या, तो २४ तासांत खराब होऊ शकतो, पण भेसळयुक्त मावा ७ ते ८ दिवसही खराब होत नाही. मोठ्या आचेवर दूध उकळून तुम्ही मावा बनवू शकता. दूध उकळल्यानंतर घट्ट होऊन सुकते आणि मलई दही होऊ लागते, तेव्हा त्याला खवा म्हणतात. माव्याचे नियमित सेवन केल्यास शरीरात कॅल्शियमची कमतरता भासणार नाही. हाडे मजबूत होतील. हे हृदयासाठीही आरोग्यदायी आहे.



मावा आणि सुका मेवा यात फरक? मावा दूध घट्ट करून तयार केला जातो हे आपण वर नमूद केले आहे. हे दुग्धजन्य पदार्थ आहे. याचा उपयोग अनेक प्रकारच्या मिठाई बनवण्यासाठी केला जातो. मावा आणि ड्रायफ्रुट्स दिसायला आणि दिसायला तुमच्यासारखेच असतील, पण दोघांमध्ये जगाचा फरक आहे. ड्राय फ्रूट्स म्हणजे ड्राय फ्रूट्स. होय, सुक्या फळांना सुका मेवा म्हणतात. तुम्ही काजू, पिस्ता, बदाम, अक्रोड, मनुका, कोरडे अंजीर, पाइन नट्स इत्यादींचे सेवन करत असाल. लोकांना सुक्या मेव्याचे बॉक्स भेट म्हणून दिले जायचे. याला सुकामेवा म्हणतात. मनुका, खजूर, अंजीर इत्यादी सुकामेवा करून काही ड्रायफ्रुट्स बनवले जातात. काही फळांचे कर्नल आहेत. हे काजू फळांच्या तेलकट बिया आहेत. हे सर्व अनेक पौष्टिक घटकांनी समृद्ध आहेत. हे खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात.

# सकाळच्या नाश्त्याला बनवा ओल्या नारळाचे स्वादिष्ट पराठे, झटपट तयार होते रेसिपी

सकाळचा नाश्ता म्हटला की, गृहिणींना आता नवीन काय बनवावे असा प्रश्न पडत असतो. अनेकदा घरच्यांना तेच तेच खाऊन कंटाळा येतो तसेच सकाळी कामाच्या गडबडीत नाश्ता बनवायला फारसा वेळ नसतो. अशात गृहिणी नेहमीच एका युनिक, सोप्या आणि झटपट तयार होणाऱ्या नाश्त्याच्या शोधात असतात. हीच गोष्ट लक्षात घेत आज आम्ही तुमच्ययसाठी एक अनोखी आणि स्वादिष्ट अशी रेसिपी घेऊन आलो आहोत.

आजच्या आपल्या रेसिपीचे नाव आहे ओल्या नारळाचे स्वादिष्ट पराठे. तुम्ही पराठा हा एक असा प्रकार आहे जो सर्वांनाच खायला फार आवडतो. तुम्ही अनेकदा आलू पराठा, मसाला पराठा असे अनेक पराठे खाल्ले असतील मात्र यावेळी काही नवीन करून पहा आणि घरी बनवा टेस्टी ओल्या नारळाचे स्वादिष्ट पराठे. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.



साहित्य अर्धा वाटी किसलेलं ओलं खोबरं एक वाटी गव्हाचे पीठ हिरव्या मिरच्या आलं - लसूण पेस्ट जिरे कोथिंबीर साखर

सुकं खोबरं १ लाल मिरची चवीपुरते मीठ तेल आणि तूप लिंबू

कृती ओल्या नारळाचे स्वादिष्ट पराठे बनवण्यासाठी सर्वप्रथम मिक्सरचे भांडे घ्या आणि त्यात अर्धा वाटी किसलेलं ओल खोबरं, ४-५ हिरव्या मिरच्या, आलं लसूण पेस्ट, जिरे, कोथिंबीर, सुकं खोबरं, १ लाल मिरची टाका आणि बारीक वाटून घ्या

यानंतर ही पेस्ट एका भांड्यात काढा आणि त्यात चवीनुसार मीठ, लिंबाचा रस आणि साखर टाकून सर्व साहित्य नीट एकजीव करून घ्या आणि हे सारण बाजूला ठेवून द्या तुम्ही यात तुमच्या आवडीचे मसालेदेखी टाकू शकता

यानंतर एका भांड्यात गव्हाचे पीठ घ्या. त्यात चवीनुसार मीठ आणि पाणी घालून चांगले मळून घ्या आता मळलेल्या गव्हाच्या पिठाचे लहान गोळे तयार करा प्रत्येक गोळ्यांमध्ये तयार सारण भरा आता गॅसवर तवा ठेवा आणि दुसरीकडे पराठा लाटायला सुरवात करा

पराठा लाटून झाला आणि गरम तव्यावर हा पराठा टाका आणि खमंग भाजून घ्या पराठ्याच्या दोन्ही बाजूंना तूप किंवा तेल लावायला विसरू नका

अशाप्रकारे तुमचे ओल्या नारळाचे पराठे अगदी कमी वेळेत बनून तयार होतील

# १०० वर्ष जगण्यासाठी जपानी लोक आहारात करतात या पेयाचा समावेश, म्हातारपणातही राहतात फिट

जपान फक्त आपल्या तंत्राद्यानासाठीच नाही तर आपल्या निरोगी लाइफस्टाइलसाठीही जगभरात ओळखला जातो. जपानी लोक संपूर्ण जगात आपल्या दीर्घायुष्यासाठी आणि परफेक्ट जीवनशैलीसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या दिनचर्येमध्ये काही खास सवयी आहेत ज्या त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याची काळजी घेतात. या सवयी त्यांना दीर्घकाळ जगण्यास आणि सुंदर दिसण्यास मदत करत असतात. जपानी लोकांच्या या सवयीमुळे आणि हेल्दी लाइफस्टाइलमुळे ते तणाव, थकवा, आणि आजारपणाच्या समस्यांपासून दूर राहतात. यासोबतच जपानी लोक आपल्या रोजच्या दिनचर्येत एका विशिष्ट पेयाचा समावेश करतात. हे पेय त्यांना म्हातारपणातही फिट राहण्यास आणि दीर्घकाळ जगण्यास मदत करतात. आज आम्ही तुम्हाला या जादुई पेयाबाबत सविस्तर माहिती सांगणार आहोत. तुम्हीही तुमच्या आहारात या पेयाचा समावेश करू शकता.

माचा टी'चे करतात सेवन खरंतर हे जादुई पेय म्हणजे जपानी लोकांचा चहा आहे. याला 'माचा टी' असे म्हटले जाते. हा चहा भारतात बनवतात त्या चहापेक्षा फार वेगळा असतो. यामध्ये ग्रीन टी प्रमाणेच अनेक पोषक घटक असतात पण त्यांचं प्रमाण फार जास्त असत. हे





चहा शरीराला अनेक फायदे मिळवून देतं. या चहाचे नियमित सेवन केल्याने मनाला शांती मिळते, शरीरात ऊर्जा राहते आणि आयुष्याची वर्षेही वाढली जातात.

कशापासून बनतो माचा टी? एका शोधात असे दिसून आले आहे की, माचा टी'चे सेवन केल्याने तणाव कमी होतो. हा चहा ९०%कॅमेलिया सिनेन्सिस झाडांच्या नव्या पानांपासून बनवला जातो, ज्यामुळे यात मोठ्या प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटीऑक्सिडंट्स शरीरातील फ्री रॅडिकल्सशी लढा देतात, ज्यामुळे शरीराचे नुकसान कमी होते. हा चहा शरीरातील विषारी घटकांशी लढण्यास मदत करतो आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. माचा टी पिण्याचे फायदे माचा टी'मधील घटक तणाव कमी करण्यास मदत करतात ज्यामुळे मन शांत आणि स्थिर राहते

नियमित माचा टी'चे सेवन केल्याने चयापचय सुधारते आणि यामुळे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते माचा चहाच्या सेवनाने शरीरात ऊर्जा निर्माण होते आणि यामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारते माचा चहातील अँटीऑक्सिडंट्स फ्री रॅडिकल्सशी लढून त्वचेचं वृद्धत्व कमी करते

# आ. कराड यांच्याकडून जोशी (भटके) समाजाला शुभकार्यासाठी लागणार्या भांड्यांचा संच भेट

लातूर : – गावोगाव समाज निहाय विविध कार्यक्रम होत आहेत. छोट्या छोट्या समाजांना अनेक वेळा, अनेक ठिकाणी अडचणी येत असल्याने लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथील जोशी (भटके) समाजाच्या वतीने सार्वजनिक विविध शुभकार्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारची ५१ हून अधिक भांड्याचा संच भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी भेट दिला आहे.

प्रत्येक समाजाला अस्तित्वाची जाणीव होत आहे. सार्वजनिक कार्यक्रमाच्या स्वयंपाकासाठी अडचणी येऊ नयेत यासाठी लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथील जोशी समाजाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडे भांडी द्यावी अशी मागणी केली होती. जोशी समाजाची मागणी आणि त्यांची अडचण लक्षात घेऊन क्षणाचाही विलंब न लावता आ. कराड यांनी भांडी देण्याचे समाज बांधवांना मान्य केले होते. त्यानूसार गुरुवारी भाजपाच्या



लातूर येथील संवाद कार्यालयात भातांगळी येथील जोशी भटके समाजाला सार्वजनिक कार्यक्रमासाठी स्वयंपाकाकरीता लागणारे मोठे पातेले, कढई, तास, चपाती भट्टा, शेगडा, बकेट, टोपले, उलथने, पोळपाट, वगराळे, सूप यासह सर्वच आवश्यक ५१ हून अधिक भांड्याचा संच भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी भाजपाचे पांडुरंग बालवाड, व्यंकटराव जटाळ, सुरेखा पुरी, लिंबराज बोळगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील भांडी मिळाल्याने जोशी समाज बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता यात्रसंगी आ. रमेशआप्पा कराड यांनी उपस्थित समाजबांधवा समवेत संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी विविध वंचित समाजाला विकासाच्या प्रवाहात आणले. गोरगरीब आठरा पगड जाती धर्मातील प्रत्येक माणसाच्या विकासासाठी अनेक योजना सुरू केल्या या सर्व योजना देत असताना भाजपाने कधीच जातीवाद केला नाही मात्र काँग्रेसवाल्यांनी तोंड बघून योजना दिली गरिबा ऐवजी बागायतदारांना लाभ दिला असल्याचे बोलून दाखविले. येणाऱ्या काळात होणाऱ्या निवडणुकीत गोरगरिबांच्या हितासाठी काम करणाऱ्या महायुतीला साथ द्यावी असेही आवाहन त्यांनी केले.

यात्रसंगी भातांगळी येथील जोशी भटके समाजातील भागवत घाविट, सुभाष भोळे, विष्णू गरड, आप्पाराव भोळे, हनुमंत भोसले, बंटी गरड, आकाश भोसले, कैलास भोसले, विकास भोळे, बापू भोळे, कल्याण गरड, भीमा भोसले, राजाभाऊ भोसले, आप्पाराव भोळे, धनंजय भोसले, मधुकर अगाडे, गोविंद भोळे यांच्यासह अनेक जण होते.

# विश्वकर्मा योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना लागणारे प्रमाणपत्र देण्यास ग्रामसेवकांची टाळाटाळ

किनवट/शेख शौकत :–प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनांतर्गतच्या बांधकाम कामगारांना नव्वद दिवसाचे ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र अनिवार्य केले असले तरी ग्रामसेवकांनी प्रमाणपत्र देण्यास मज्जाव केल्याने बहूतांश कामगार योजनेच्या लाभापासून वंचित राहात आहेत. गटविकास अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करुन मार्ग काढावा अन्यथा न्यायहक्कासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते संदीप निखाते व वेगळे वेगळे कामगार संघटनेच्या वतीने दिला आहे. मुळात ग्रामपंचायतीच्या हद्दीत ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी करुनही रोहयोची कामे दिली जात नाहीत. दुसरीकडे कामगारांनी पंजीकृत संस्थांकडून नव्वद दिवसाचे प्रमाणपत्र जोडल्यामुळे गुंतागंत वाढली असल्याचे दिसत आहे. बांधकाम कामगारांना वैयक्तीक लाभासाठी आणि पाल्यांच्या शैक्षणिक



शिष्यवृत्तीसाठी नव्वद दिवसाचे नुतनीकरण केलेले ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र अनिवार्य केलेले असल्याने बांधकाम कामगार ग्रामसेवकाकडे खेटे मारीत आहेत. याकामी ग्रामसेवकांनी असहकार्याची भूमिका घेतली असल्याने कामगारांसह कामगार संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून असहकारामुळे रस्त्यावर उतरण्याची भूमिका व्यक्तविली आहे. या संबधी नान्याची दुसरी बाजू समजून घेण्यासाठी म्हणून ग्रामसेवकांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांची सहकार्याचीच भूमिका असल्याचे स्पष्ट संकेत मिळाली. नव्वद दिवस काम केल्याचे पंजिकृत संस्थांचे प्रमाणपत्र कामगारांनी मिळवले आहे. त्यांनी ते आँनलाईन नोंदणी केल्यानंतर पडताळणीसाठी ग्रामपंचायतीकडे पाठवल्या जाते. त्यावेळी त्या प्रमाणपत्राला ग्रामसेवकांकडून पुष्टी दिल्या जाते असे सांगण्यात आले.

# जिल्हा क्रीडा संकुल येथे १ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आरोग्य शिबीर

लातूर :– दरवर्षी ०१ ऑक्टोंबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरीक दिन म्हणून साजरा करण्यात येतो, या दिनाचे औचित्य साधून १ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत बॅडमिंटन हॉल, जिल्हा क्रिडा संकुल, लातूर येथे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर व सह्याद्री हॉस्पिटल, लातूर यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मार्केट यार्ड, शिवनेरी गेटसमोर, डाल्डा फॅक्टरी कंपाऊंड, लातूर येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभाग जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बी.आर. पाटील, जिल्हा जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर.बी. जोशी, लातूर जिल्हा जेष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाश धादगिने व ज्येष्ठ नागरिक संघाचे विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य तपासणी शिबीरास व मुख्य कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, व महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ लातूर शाखा यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आवाज गुरुजींचा वेध देशाच्या भवितव्याचा आवाज कार्यशाळा संपन्न

लातूर :– २७ सप्टेंबर रोजी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहायता केंद्र, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, करिअर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील प्राध्यापकांसाठी आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा आवाजाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर हे होते तर उद्घाटक म्हणून संचालक श्री राजेश्वर बुके, सहसचिव सुनील मिटकरी, प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, प्रसिद्ध आवाज रोग निवारण तज्ञ सोनाली लोहार, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, डॉ. मनोहर चपळे आणि डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांची उपस्थिती होती यात्रसंगी मनोगत व्यक्त करताना श्री राजेश्वर बुके म्हणाले की, आवाज हे प्राध्यापकांचे मूळ भांडवल आहे त्याचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी काळजी घेतली पाहिजे.



या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना यशवंत शितोळे यांनी करिअर कट्टा उपक्रमाबद्दल माहिती दिली व या उपक्रमात सामील होऊन प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे हित वृद्धिंगत करावे असे आवाहन केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक सोनाली लोहार यांनी मनुष्याच्या आवाजाचे विविध प्रकार व त्याचे आरोग्य आवाजाच्या बिघाडातून आरोग्यासंबंधी मिळणाऱ्या सूचना व आवाजाच्या आरोग्यासंबंधी विविध व्यायाम याविषयी प्रात्यक्षिक मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर आपल्या अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, आवाजाच्या कार्यशाळेचे आयोजन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. अध्यापन प्रक्रियेमध्ये आवाज हा मूलभूत घटक असून त्यासंबंधीची कार्यशाळा घेऊन आवाज व वाकयंत्राची काळजी व त्याचा व्यायाम हा लाभदायक ठरू शकतो. यात्रसंगी सहसचिव सुनील मिटकरी आणि प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी आवाजाच्या कार्यशाळेचे महत्व विशद केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नयन राजमाने, प्रास्ताविक डॉ. मनोहर चपळे तर आभार डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, लातूर जिल्ह्यातील करिअर कट्टा समन्वयक आणि प्राध्यापक इतर शहरातील व्यक्ती यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

## अरुणाचलच्या शिखराचे नामकरण; चीनचा तिळपापड, तणाव वाढला

नवी दिल्ली : वृत्तसंस्था भारताने अरुणाचल प्रदेशातील एका शिखराला नाव दिल्याने चीनचा चांगलाच तीळपापड झाला आहे. आता भारत आणि चीन यांच्यातील टेन्शन पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. खरे तर, भारताने अरुणाचल प्रदेशातील एका शिखराला सहावे दलाई लामा त्सांगयांग ग्यात्सो यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला. चीनने शिखराला नाव देण्यावरून नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, अरुणाचल प्रदेश हा आपल्या जांगनानचा भाग असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, चिनी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान म्हणाले, व्यापक दृष्टीने बोलायचे झाल्यास, जांगनानचा प्रदेश हा चीनचा प्रदेश आहे आणि भारताने चीनच्या भूभागात तथाकथित अरुणाचल प्रदेश स्थापन करणे बेकायदेशीर आणि अवैध आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनियरिंग अँड ॲडव्हेंचर स्पोर्ट्सच्या टीमने अरुणाचल प्रदेशातील २०,९४२ फूट उंच असलेल्या आणि नाव नसलेल्या शिखरावर यशस्वी चढाई केली. यानंतर संघाने या शिखराला सहावे दलाई लामा त्सांगयांग ग्यात्सो यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला. 'एनआयएमएएस' संरक्षण मंत्रालयाअंतर्गत कार्य करते आणि अरुणाचल प्रदेशातील दिरांगमध्ये स्थित आहे. शिखराचे नामकरण करण्यासंदर्भात संरक्षण मंत्रालयाने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, सहाव्या दलाई लामा यांचे नाव शिखराला देणे, ही त्यांचे योगदान आणि बुद्धीला आदरांजली आहे.

# एमआयटी बी. फार्मसी महाविद्यालयात जागतिक औषध निर्माता दिन साजरा

## आरोग्य व्यवस्थेमधील फार्मासिस्ट एक महत्वाचा दुवा–पृथ्वीराज कराड

लातूर : – माईर पुणे, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटीकल सायन्सेस, (बी.फार्मसी) कॉलेज, एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथे जागतिक औषध निर्माता दिन २५ सप्टेंबर २०२४ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड, एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, उपअधिष्ठता डॉ. बी. एस. नागोबा, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन मुंडे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे उपस्थित होते.




यावेळी बोलताना एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशअप्पा कराड यांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील एक महत्वाचा दुवा फार्मासिस्ट असून औषधे खरेदी करताना फार्मासिस्ट म्हणून जो काही विश्वास आहे ती प्रतिमा जपणे, व सचोटीने व्यवसाय करणे हेच एका आदर्श फार्मासिस्टचे कर्तव्य आहे. फार्मासिस्ट्स हा नेहमी दिवसरात्र कठोर परिश्रम करून समाजाला निरोगी ठेवण्याचे काम करत असतो असे त्यांनी बोलून दाखवले. यात्रसंगी दरम्यान डॉ. चंद्रकांत शिरोळे, डॉ. बी. एस. नागोबा यांनी औषध निर्माता यांचे कार्य आपल्या समाजासाठी किती मोलाचे आहे यावर मौलिक विचार मांडले व फार्मासिस्ट् बांधवांचा गौरव केला. तसेच बी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी जेनेरिक औषधाविषयी असलेले गैरसमज, औषधाचा गैरवापर यामुळे या पासून होणाऱ्या दुष्परिणाम याबद्दल रोल प्लेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.


कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व फार्मासिस्ट प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली. कार्यक्रमांचे नियोजन हे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे यांनी केले तर, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. पी. आर. गुळभिले, प्रा. एस. पी. पाटील, प्रा. एस. एस. साळुंके, प्रा. एस. एस. खंदाडे व सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आज मालमत्ता कर शास्तीत १००% सुट शास्तीत १००% सुट मिळवण्याची यावर्षातील शेवटची संधी

## मनपाची थकबाकीदार याना पुन्हा एकदा शास्ती सुट ची भेट

लातूर/प्रतिनिधी:कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच १००% कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून कर संकलन केले जात आहे. त्यादृष्टीने नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी वर्षाच्या सुरुवातीस विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. तसेच थकबाकीदार यांच्या कडील थकीत कर वसुलीस चालना देण्यासाठी यापूर्वी दोन वेळा १००% शास्ती माफी योजना लागू करण्यात आले होती. तथापि काही थकबाकीदार प्रतिसाद देत नसल्याने, त्यांची प्रकरणे लोक अदालत मधे ठेवण्यात आले आहेत. तसेच, थकबाकीदार मालमत्ताधारका साठी उद्या दि २८ सप्टेंबर रोजी मालमत्ता करात १००% शास्ती माफी देण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे. सदरील योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकाना घेता यावा यासाठी शनिवारी सर्व क्षेत्रीय कार्यालयातील कर संकलन केंद्र सुरू राहणारं आहेत, व मालमत्ता धारकाना ऑनलाइन पधतीने ही टॅक्स भरणा करता येणार आहेत. तरी उदयाला देण्यात येणारी १००% शास्ती माफी ही या वर्षातील शेवटची शास्ती माफी योजना असल्याने अधिकाधिक मालमत्ताधारकांनी १००% शास्ती माफी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा व शहर विकासात हातभार लावावा असे आव्हान मनपा उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.





कर भरणा करण्यासाठी सिटीझन ॲप किंवा या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय मालमत्ता कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या १००% शास्ती माफीचा घेण्यात यावा.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE